नि.फौ.ख.क्र. २८०/२०१७

सरकार –वि– संतोष वाघमारे

नि.क्र. १५

## <u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते कीः–

माझे नाव — सत्यभामा संतोष वाघमारे,

वय. ३० वर्षे, व्यवसाय — शेती,

राहणार — भोनगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

## <u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>

१. संतोष सोबत माझे लग्न कोणत्या वर्षी झाले होते हे आता मला आठवत नाही. आरोपी हा माझा पती आहे. संतोषसोबत माझे लग्न अकोला येथील नोंदणी कार्यालयात झाले होते. लग्नानंतर मी डोंगरगाव येथे नांदायली गेली होती. डोंगरगाव येथे मी, माझे सासु सासरे, नणंद, दिर व पती यांच्यासोबत एकत्र कुटूंबात नांदत होती. लग्नानंतर आरोपींनी मला सुरुवातीपासूनच त्रास दिला. आरोपीला बाहेरच्या बायांचा नाद असल्यामुळे त्याने मला त्रास देण्यास सुरुवात केली. तु मला पाहिजे नव्हती, तु तुझ्या आईकडे परत जा असे म्हणून आरोपी मला त्रास द्यायचा. जशी मी माझ्या पहिल्या पत्नीला जाळले तस मी तुला जाळुन मारेल असे आरोपी मला धमकी देत होता. आरोपीने धमकी देवून सुध्दा मी घाबरली नाही कारण की मला आरोपीसोबत संसार करायचा होता. आरोपी माझ्यासोबत रोज याच कारणावरुन भांडण करत होते. आरोपीने माझ्यावर तेजाब मिश्रीत रॉकेल टाकले होते. सदरची घटना संध्याकाळी ०८.०० वाजता घडली होती. तु मला कितीही फसवायचा प्रयत्न कर पण मी फसणार नाही असे आरोपी मला म्हणत होता. पोलीस स्टेशन व कोर्ट माझ्या खिशात असल्यामुळे तु मला काही करु शकत नाही असे आरोपी मला म्हणत होता. रॉकेल टाकल्यानंतर मला माझ्या पतीने माझ्या आईकडे घेवून गेले होते व तेथून मला माझ्या आईने दवाखान्यात नेले. मला दवाखान्यात नेले त्यावेळेस मी होशमध्ये नव्हती. ज्यावेळेस आरोपीने माझ्यावर रॉकेल टाकले होते त्यावेळेस मी शेगाव येथील धनोकार नगर येथे राहत होती. मला त्रास देण्यासाठी आरोपीला त्याच्या घरच्यांकडून प्रोत्साहन मिळत होते. माझ्या मुलाने कितीही बाया वापरल्या तरीही मला तुझी गरज नाही असे आरोपी क्र. १ ची आई यशोदा मला म्हणत होती. आरोपीने माझ्यावर रॉकेल टाकण्यापूर्वी डोंगरगाव येथे रस्सीने माझे पूर्ण

शरीर बांधले होते व त्याच अवस्थेत मला धनोकार नगर येथे आणले होते. आरोपीने माझ्यासोबत केलेले कृत्य मी माझ्या आई वडीलांना सांगितले होते. माझ्यावर उपचार शेगाव व अकोला येथे झाला होता. दि. ०३.१०.२०१७ रोजी माझ्यावर उपचार झाल्यानंतर अकोला येथील सरकारी रुग्णालयातून मला सुट्टी मिळाली होती. माझे गावामध्ये बरेच अवैध धंदे आहेत असे आरोपीने मला सांगितले होते. आरोपी संतोषपासून मला विद्या नावाची मुलगी आहे व ती सध्या पाचव्या वर्गात आहे. डोंगरगाव येथे माझे आरोपीशी भांडण होत असल्यामुळे मी आरोपीसोबत शेगाव येथे राहायला आली होती. डोंगरगाव येथे भांडण झाल्यानंतर मी माहेरी गेली असता आरोपी माहेरी येवून तुला चांगले वागवतो असे म्हणून मला घेवून गेला होता. त्यानंतर सुध्दा आरोपीच्या वागणुकीत कोणतीही सुधारणा झाली नाही व आरोपीने मला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरुच ठेवले. त्यानंतर मी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. आता मला रिपोर्ट व छापील एफ.आय.आर. दाखविला. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. रिपोर्ट व छापील एफ.आय.आर. ला **<u>नि.क्र.१६ व १७</u>** देण्यात येते. तु मेली तर ज्या स्त्रीसोबत माझे अनैतिक संबंध आहेत तिला मी घरी आणेल असे आरोपी मला म्हणत होता. आरोपीने त्या स्त्रीला घरी आणले व सध्या आरोपीला त्या बाईकडून एक मुलगा आहे. सदर घटनेबाबत मी माझ्या आईला व वडीलांना फोनवर माहिती देत होती.

२. ज्यावेळेस आरोपीने माझ्यावर रॉकेल टाकले होते त्यावेळेस मी घातलेले सर्व वस्त्र पोलीसांनी जप्त केले होते. ते सर्व वस्त्र मला दाखविले तर मी ओळखु शकते. माझ्याकडून पोलीसांनी पाच लिटर क्षमतेची एक कॅन जप्त केली होती. ती कॅन दाखविली तर मी ओळखु शकते.

**<u>मुद्देमाल न्यायालयात दाखल न केल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०६.१०.२०२५ | दि.०६.१०.२०२५ |